# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ६३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०३/१०/२०१६

**१) कारच्या डिक्कीमधील स्टेपनीची चोरी . :–**

दिनांक ०१/१०/०१६ ते ०२/१०/२०१६ चे २१.३० ते ०९.०० वा. दर. यातील फिर्यादीने आपल्या आय–२० कंपनीची कार क्र. एमएच ३६ एच ७३५५ ही घरासमोर उभी करून ठेवली असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन गाडीच्या मागील डिक्की मध्ये ठेवलेली स्टेपनी कि. ९,०००/–रू. ची चोरून नेल्याने फिर्यादी सय्यद बरकत जाफरी वय ४५ वर्ष रा. भोजापुर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) अज्ञात कारचालकांच्या लापरवाहीने, एक जखमी . :–**

दिनांक ०२/१०/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी जखमी हा हायवे रोड पायदळ क्रॉस करीत असतांना भंडारा कडुन येणा–या यातील अज्ञात चार चाकी आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन जखमीला लहरी बाबा मठ येथे धडक मारुन दुखापत करून कारसह पळुन गेला. असे फिर्यादी त्रिशुल गंगाराम सिडाम वय २७ वर्ष रा. साकोली यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १३४,१८७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) मुलाने आईलाच गंभिर दुखापत करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक ०२/१०/२०१६ रोजी १२.४५ वा. दर. यातील फिर्यादी ही आरोपीची आई असुन एकत्र राहतात घरघुती कारणावरून आरोपीने फिर्यादी (आईस) तु मला डेअरीतुन दुध आनावयास का सांगतेस असे बोलुन भांडन करून अश्लिल शब्दात शिविगाळ करून फिर्यादीचे हात ओढुन बुक्या–बुक्याने डोक्यावर मारून आपखुशिने दुखापत करून व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी श्री. आशाबाई हनुमानदास अग्रवाल वय ६६ वर्ष रा. साकोली यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,२९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. सिहोरा व आंधळगाव येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभट्टी दारु कि. २,०००/–रु. व १ लिटर ८० मिली लिटर देशी दारु कि. २८४/–रु. असा एकुण कि. २,२८४ /–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.